# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:- 3 मार्च,२०२२

---

जळगाव, दि. 03 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे दि. १६ व १७ मार्च रोजी नेट, सेट आणि पेट परीक्षेच्या पहिल्या पेपर करिता राज्यस्तरीय ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन बुधवार दि. १६ रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन होणार आहे. ही कार्यशाळा सेट व नेट परीक्षेच्या पेपर क्र. 1 वर आधारीत असून पीएच. डी. पूर्व प्रवेश (पेट) परीक्षेसाठी देखील उपयुक्त असून, कार्यशाळा सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत झुम अॅप व युट्यूब द्वारे दोन्ही दिवशी (१६ व १७ मार्च ) ऑनलाईन आयोजित करण्यात येत आहे.

कार्यशाळेत पहिल्या दिवशी (दि. १६ मार्च) प्रथम मार्गदर्शन सत्रात प्रा.डॉ. कमलाकर पायस (तक्षशिला महाविद्यालय, अमरावती) तर दुपारच्या सत्रात प्रा.डॉ राजेश बोबडे (शामप्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदूरजनाघाट, वरूड, जि.अमरावती) हे मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या दिवशी (दि. १७ मार्च) प्रथम सत्रात प्रा.पल्लवी इंगोले (वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि.अमरावती) तर दुपारच्या सत्रात प्रा.डॉ. रविंद्र पाटील (या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिवसा, जि.अमरावती) हे मार्गदर्शन करतील.

कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना नि:शुल्क प्रवेश असून सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी अर्ज भरणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात मोबाईल क्रमांक 8407922404 किंवा 9860046706 वर संपर्क साधावा असे आवाहन कार्यशाळेचे मुख्य संयोजक विभागप्रमुख प्रा.डॉ. सुधीर भटकर, सहसंयोजक डॉ. विनोद निताळे, डॉ. गोपी सोरडे, डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी केले आहे.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**(डॉ.सुनील पाटील)**
**जनसंपर्क अधिकारी**